## प्रेस नोट

दि. १७/०५/२०२३

आरोपी लोकसेवक यांनी खाजगी इसमाने मार्फतीने लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो /घटक | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | --- |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | **लोकसेवक**<br>१) श्री रज्जाक रशिद मन्सुरी, वय-५१ वर्षे, व्यवसाय- नोकरी, वनपाल, वनपरिमंडळ अधिकारी, मांडवी, ता.वसई, जि-पालघर,<br>**खाजगी इसम**<br>२) श्री दानीयाल हाजी खान, वय-५२ वर्षे, व्यवसाय- शेती, |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | मागणी केलेल्या रक्कमेतील पहिला हफ्ता २,५०,०००/- रुपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचे जमिनीवर विनापरवानगी वाढीव बांधकाम केल्यामुळे त्यांचे विरुध्द कारवाई न करण्याकरीता आरोपीत क्र १ यांनी आरोपीत क्र. २ यांचे मार्फत तक्रारदार यांचेकडे ५,००,०००/-रुपये लाचेची मागणी करत असलेबाबत दि १०/०५/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. १६/०५/२०२३ व दि. १७/०५/२०२३ रोजी लोकसेवक श्री रज्जाक रशिद मन्सुरी व खाजगी इसम श्री दानीयाल हाजी खान यांची पडताळणी केली असता खाजगी इसम श्री दानीयाल हाजी खान याने लोकसेवक श्री रज्जाक रशिद मन्सुरी, वनपाल यांचेकरीता व स्वःतासाठी असे एकूण ५,००,०००/-रुपये लाचेची मागणी केली. नमुद लाचेच्या रक्कमेतील पहिला हफ्ता २,५०,०००/-रुपये आज दि. १७/०५/२०२३ रोजी स्वीकारण्याचे लोकसेवक व खाजगी इसम यांनी मान्य केले होते. त्याअनुषंगाने शिरसाड फाटा येथे दि. १७/०५/२०२३ रोजी केलेल्या सापळा कारवाईदरम्यान खाजगी इसम श्री दानीयाल हाजी खान याने लाचेच्या रक्कमेतील पहिला हफ्ता २,५०,०००/-रुपये स्विकारताना तसेच लोकसेवक श्री रज्जाक रशिद मन्सुरी यांना नमुद लाचेचा पहिला हफ्ता सुपूर्द करत असताना रंगेहात पकडण्यात येवून ताब्यात घेण्यात आले आहे.<br>सदर बाबत गुन्हा दाखल करण्याचे काम मांडवी पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालय, येथे चालु आहे. |

**मार्गदर्शनअधिकारी- मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :- लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :-acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल-spacbthane@mahapolice. Gov.in
अॅप्लीकेशन -acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर -१०६४, दुरध्वनी कमांक -०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅप् कमांक -९९३०९९७७००
दि. १७/०५/२०२३

ASPatil

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.